# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.१७/२०२४/नंदुरबार मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.कैलास मोठाभाऊ भदाणे,<br>रा.मु.पो.उंभर्टी,<br>ता.साक्री, जि.धुळे. | वनपरिक्षेत्र अधिकारी,<br>वनपरिक्षेत्र अधिकारी नवापूर (प्रादेशिक) यांचे कार्यालय,<br>लिमडावाडी, गांधी पुतळयासमोर, मु.पो.ता.नवापूर,<br>जि.नंदुरबार ४२५ ४१८. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.१७/२०२४/नंदुरबार संदर्भात दि.१६/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"प्रथम अपिल सुनावणीवेळी कार्यरत (दि.०२/११/२०२३ रोजी कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नवापूर (प्रा.) यांचे कार्यालय, नवापूर ता.नवापूर, जि.नंदुरबार यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नवापूर (प्रादेशिक) नवापूर ता.नवापूर, जि.नंदुरबार श्रीमती एस.सी.अवसरमल यांनी आयोगाकडे दि.३०/०१/२०२६ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदार यांनी मागविलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे दिनांक, कालावधी, प्रशिक्षक इ. प्रकारची व्यक्तीगत स्वरुपाची माहितीची मागणी केलेली होती. परंतू त्यावेळी माझ्याकडे अतिसंवेदनशील अशा दोन वनक्षेत्रांचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यामुळे अतिसंवेदनशील भाग तसेच सदर अतिरिक्त कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत अतिक्रमण निष्कासनाची मोठी मोहीम सुरु होती. त्यामुळे सदर अर्जदारास उत्तर देणे कामाच्या व्यापामुळे अनवधानाने राहून गेलेले दिसून येत आहे. सदर बाबतीत माझ्याकडून झालेल्या चुकीबद्दल मी आयोगाची नम्र माफी मागत असून, भविष्यात अशी चूक होणार नाही याची दक्षता घेईल. तरी सदर प्रकरणी शास्ती लावण्यात येऊ नये ही विनंती.

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, प्रथम अपिल निर्णयावेळी कार्यरत (दि.०२/११/२०२३ रोजी) असलेल्या जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी नवापूर (प्रादेशिक) यांचे कार्यालय, नवापूर ता.नवापूर, जि.नंदुरबार श्रीमती एस.सी.अवसरमल यांच्याकडे त्या वनपरिक्षेत्राचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला असल्याचे दिसून येते. तसेच सदर कार्यक्षेत्रात अनधिकृत अतिक्रमण निष्कासन मोहिम सुरु असल्याने तक्रारदार यांनी मागणी केलेली माहितीबाबत नजरचुकीने तक्रारदार यांना सूचित करण्याचे राहून गेलेले असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार असल्याने अनवधनाने तक्रारदार यांना माहिती देण्याचे राहून गेलेले असून त्यामध्ये माहिती न देण्याचा अथवा टाळाटाळ करण्याचा हेतू दिसून येत नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार (श्रीमती एस.सी.अवसरमल) यांनी दि.३०/०१/२०२६ अन्वये आयोगास सादर केलेला खुलासा समर्थनीय

असल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार (श्रीमती एस.सी.अवसरमल) यांनी आयोगास सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्यामुळे मान्य करण्यात येवून त्यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.१७/२०२४/नंदुरबार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जा.क्र. ८७८ , दिनांक :- 03 FEB 2026